## प्रेस नोट ता. १७/०५/२०२३ पोलीस स्टेशन - वाकड

# रात्रीचे वेळी लोकांना कोयत्याने मारहाण करुन लुटणारी टोळी जेरबंद, आरोपींकडुन ०४ गुन्हे उघड करत किं.रु. १,६०,०००/- चा मुद्देमाल जप्त
# वाकड पोलीस स्टेशन तपास पथकाची कामगिरी.

--- ०० ---

पिंपरी चिंचवड परीसरात होणा-या जबरी चो-यां मध्ये मोठया प्रमाणावर वाढ झालेने **मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त,पिंपरी चिंचवड,** यांनी सर्व पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी यांना गुन्हयांना प्रतिबंध व जबरी गुन्हे उघड करणेबाबत आदेश दिले आहेत.

त्या अनुषंगाने मा.श्री.गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक वाकड पोलीस ठाणे यांनी त्यांचे अधिनस्थ असलेल्या तपास पथकाकील सपोनि संतोष पाटील, पोउपनि.सचिन चव्हाण व तपास पथक अंमलदार यांची वेगवेगळी पथके तयार करून आरोपीना अटक करून गुन्हे घडणारी वेळ व रस्ते यावर प्रतिबंधात्मक पेट्रोलींग करत गुन्हयांना आळा घालणे व आरोपींना पकडुन गुन्हे उघड करणेबाबत सुचना दिल्या.

त्याप्रमाणे तपास पथकातील अधिकारी व अंमलदार तांत्रीक व पांरपारीक पध्दतीने तपास सुरु केले. सपोनि.संतोष पाटील व त्यांचे सोबतचे पोलीस स्टाफ रात्रीचे वेळी पेट्रोलींग करीत असताना त्यांना वाकड स्मशानभुमीजवळ अंधारात काही इसम संशयीतरीत्या थांबलेले दिसल्याने त्यांना ताब्यात घेवुन नाव पत्ता विचारला असता त्यांनी आपली नावे १) प्रमोद दयानंद कांबळे वय २१ वर्षे व्यवसाय- बेरोजगार रा.सर्वे नं.५९, १ बी /१, सुयोग कॉलनी रहाटणी पुणे २) प्रफुल्ल राजु वाघमारे वय २१ वर्षे व्यवसाय- कामगार रा.कैलासनगर,मोठादेवी मंदीर काकडे बिल्डींग फ्लॅट नं.१०२, थेरगाव पुणे मुळ रा. शिवाजीनगर सोलापुर ३) पवन शहादेव जाधव वय २१ वर्षे व्यवसाय-दुकानात कामगार रा.नखातेवस्ती, मथुरा कॉलनी, रहाटणी पुणे मुळ रा.शेगाव ता.संग्रामपुर जि.बुलढाणा ४) रोहीत ऊर्फ बॉण्ड राहुल शिंदे वय १९ वर्षे व्यवसाय-बेरोजगार रा.नखातेवस्ती गुलमोहर कॉलनी, विटभट्टी जवळ, बसेरा बिल्डींग शेजारी रहाटणी पुणे ५) राहुल कॅप्टन मोरे वय २० वर्षे व्यवसाय-बेरोजगार रा.रामकृष्ण मंगल कार्यालयाजवळ, श्रीअभंग कॉलनी,गायकवाड यांचे खोलीत भाडयाने पिंपळे गुरव, पुणे मुळ रा.गोडोली जि.सातारा असे सांगीतले. सदरचे सर्वजण हे रेकॉर्डवरील गुन्हेगार असलेने त्यांचेकडे अधिक तपास केला असता त्यांचेकडे ०३ धारदार कोयते सापडले त्यामुळे आरोपींविरुध्द् गु.रजि.नं.४७२/२०२३ भादविक ३९९, आर्म अॅक्ट ४,२५, महा.पो.का.क.३७(१)(३)सह १३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयात आरोपींकडे कसोशीने तपास केला असता त्यांनी रात्रीचे वेळी रस्त्याने जाणारे लोकांना कोयत्याने मारहाण करुन लुटल्याची कबुली दिलेने त्यांचेकडुन एकुण ०४ उघड करुन एकुण **१,६०,०००/- रुपये किंमतीचा** मुददेमाल हस्तगत करण्यात आला असुन तपास चालु आहे.

**आरोपीकडुन खालील गुन्हे उघड करणेत आले आहेत.**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.नंबर | कलम |
|---|---|---|---|
| १ | वाकड | ४५४/२०२३ | भादविक ३९४,३२३,५०४,५०६,३४ |
| २ | वाकड | ४७१/२०२३ | भादविक ३९७,३९४,३४१,५०६,आर्म अॅक्ट ४,२५ महा.पो.का.क.३७ (१)(३) सह १३५ |
| ३ | वाकड | ४८०/२०२३ | भादविक ३९४,आर्म अॅक्ट ४,२५ महा.पो.का.क. ३७ (१) (३) सह १३५ |
| ४ | हिंजवडी | ६२१/२०२३ | भादविक ३९२,३४,आर्म अॅक्ट ४,२५ |

सदरची कारवाई मा. श्री. विनयकुमार चौबे सो, पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड, मा.श्री.डॉ.संजय शिंदे सो, सह.पोलीस आयुक्त, मा.श्री. वसंत परदेशी, अपर पोलीस आयुक्त, मा. श्री. डॉ.काकासाहेब डोळे सो, पोलीस उप आयुक्त,परि-२, पिंपरी चिंचवड, मा. श्री. श्रीकांत डिसले, सहा.पोलीस आयुक्त सो, वाकड विभाग, पिंपरी चिंचवड यांचे मार्गदर्शनाखाली मा.श्री. गणेश जवादवाड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, मा.श्री.रामचंद्र घाडगे पोलीस निरीक्षक गुन्हे-२, सपोनि.संतोष पाटील,पोउपनि.सचिन चव्हाण, सपोफौ.बिभीषण कन्हेरकर, सपोफौ.बाबाजान इनामदार, सपोफौ.राजेंद्र काळे,पोहवा.वंदु गिरे, पोहवा संतोष बर्गे, पोहवा.संदीप गवारी, पोहवा.दिपक साबळे, पोहवा.स्वप्निल खेतले, पोहवा.अतिश जाधव, पोहवा.प्रमोद कदम, पोना.अतिक शेख, पोना.विक्रांत चव्हाण, पोना.राम तळपे, पोना.प्रशांत गिलबीले, पोशि.अजय फल्ले, पोशि.तात्या शिंदे, पोशि.कौतेंय खराडे, पोशि.भास्कर भारती, पोशि.स्वप्निल लोखंडे, पोशि. सौदागर लामतुरे, पोशि.विनायक घारगे, पोशि रमेश खेडकर, यांनी मिळुन केली आहे.

**(डॉ.काकासाहेब डोळे)**
पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ-२, पिंपरी चिंचवड